RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ५, अंक २५] शुक्रवार, फेब्रुवारी १५, २०१९/माघ २६, शके १९४० [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ५३**

**प्राधिकृत प्रकाशन**

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

**ग्रामविकास विभाग**

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट,
मुंबई ४०० ००१, दिनांक १५ फेब्रुवारी २०१९.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम.**

क्रमांक.व्हीपीएम २०१६/प्र.क्र.१८९/पंरा ४ (२२) .- महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, ( सन १९५९ चा ३), याच्या कलम १७६, पोट-कलम (२) च्या खंड (सव्वीस) व खंड (बत्तीस) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व त्या बाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्याचे योजलेल्या नियमांचा पुढील मसुदा हा, त्यामुळे बाधा पोहोचण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीकरिता उक्त अधिनियमाच्या कलम १७६ च्या पोट-कलम (४) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे, आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, उक्त मसुदा महाराष्ट्र शासन दिनांक १८ मार्च २०१९ रोजी किंवा त्यानंतर विचारात घेईल.

२. उक्त मसुद्याच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही हरकती किंवा सूचना संबंधित जिल्ह्याचा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे उपरोक्त दिनांकापूर्वी प्राप्त होतील त्या शासन विचारात घेईल.

**नियमांचा मसुदा**

१. या नियमांना महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (सुधारणा ) नियम, २०१९ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम, १९६० ( यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य नियम " असा करण्यात आला आहे) त्यांच्या नियम ७ मध्ये उप नियम (४) खंड (ड) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—



Scanned by CamScanner

"(ड-१) महाराष्ट्र वीज निर्मिती कंपनीने, ग्रामपंचायत हद्दीमध्ये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत उभारण्यात आलेल्या आणि महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरणाकडे नोंदणी करण्यात आलेल्या प्रकल्पांना, महाराष्ट्र वीज निर्मिती कंपनी किंवा महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरण अशा सक्षम प्राधिकरणाचे, तो प्रकल्प मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत असल्याचे जे प्रमाणपत्र त्या प्रमाणपत्रामध्ये प्रकल्पाची उभारणी पूर्ण झाल्याचा दिनांक विनिर्दिष्ट केलेला असेल अशा प्रमाणपत्राच्या अधीन राहून, प्रकल्पाची उभारणी पूर्ण झाल्याच्या दिनांकापासून ३० वर्षांकरिता मालमत्ता कर आकारणीमधून सूट देण्यात येईल."

३. महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम, १९६० ( यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य नियम " असा करण्यात आला आहे) यांच्या नियम २० मध्ये, उप नियम (१) नंतर पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त महामंडळ" असा करण्यात आला आहे.) हद्दीत येणाऱ्या पंचायतीच्या महसुली क्षेत्रातील जमीन, इमारती व मालमत्ता यांवरील स्वच्छता कर व दिवाबत्ती कर यांसहित मालमत्ता कर यांची वसुली पंचायतीच्या वतीने उक्त महामंडळाकडून करण्यात येईल आणि ५० टक्के इतकी रक्कम ते स्वत:कडे ठेवून घेईल आणि ती रक्कम कर वसुलीवर केलेल्या प्रशासकीय खर्चासाठी वापरील आणि महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ४५ खालील अनुसूची १ मध्ये नमूद केलेल्या गावांच्या सूचीतील अनुक्रमांक २९, ३१ (भाग), ३२, ३९, ४०, ४१, ४५, ५०, ५२ व ५३ यांमध्ये नमूद केलेल्या सेवा पुरवण्याची कार्यवाही करील, आणि वसुल केलेल्या रकमेच्या ५० टक्के इतकी रक्कम पंचायत खात्यामध्ये जमा करील. उक्त महामंडळ, दरवर्षी प्रत्येक वित्तीय वर्षामध्ये त्याने वसूल केलेल्या करांचे विवरणपत्र देईल आणि पंचायतीस उक्त अधिनियमाच्या कलम १२९ च्या पोट-कलम (७) अनुसार, उक्त महामंडळाने वसूल न केलेले कर वसूल करता येतील.".

४. मुख्य नियमांच्या भाग-२ ला जोडलेल्या अनुसूची अ मध्ये, अनुक्रमांक ४ मध्ये, स्पष्टीकरण (अकरा) नंतर पुढील स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात येईल :—

" (बारा) जमिनीवरील उभारलेल्या सौर वीज निर्मिती प्रकल्पांना केवळ जमीन किंवा मोकळा भूखंड मानण्यात येईल व जमिनीवरील कराच्या किमान दराने कर आकारणी करण्यात येईल. सौर वीज प्रकल्पांतील सौर संयंत्राव्यतिरिक्त अन्य बांधकामांवर किंवा इमारतींवर नियमानुसार कर आकारणी करण्यात येईल. संपूर्ण सौर ऊर्जा प्रकल्पासाठी, औद्योगिक व वाणिज्यिक वापराचा भारांक अनुज्ञेय असणार नाही. इमारतींच्या छतावरील सौर वीज निर्मितीच्या संयंत्रांवर मालमत्ता कर आकारणी करण्यात येणार नाही.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

विजय शिंदे,

शासनाचे उप सचिव.

Scanned by CamScanner

**RURAL DEVELOPMENT DEPARTMENT**

Bhandhkam Bhavan, 25, Marzban Path, Fort,
Mumbai 400 001, dated the 15th February 2019

*NOTIFICATION*

MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS ACT.

No. VPM-2016/CR-189/PR.4(22).—The following draft of rules further to amend the Maharashtra Village Panchayat Taxes and Fees Rules, 1960, which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by clause *(xxvi)* and clause *(xxxii)* of sub-section *(2)* of section 176 of the Maharashtra Village Panchayats Act (III of 1959), and of all other powers enabling it in this behalf, is hereby published as required by sub-section *(4)* of section 176 of the said Act, for the information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the 18th March, 2019.

2. Any objections or suggestions which may be received by the Chief Executive Officer, Zilla Parishad in concerned District, from any person with respect to the said draft before the aforesaid date will be considered by the Government.

**DRAFT RULES**

1. These rules may be called the Maharashtra Village Panchayats Taxes and Fees (Amendment) Rules, 2019.

2. In rule 7 of the Maharashtra Village Panchayats Taxes and Fees Rules, 1960 (hereinafter referred to as "the principal Rules"), in sub-rule *(4)* after clause (e), the following clause shall be added, namely :—

"*(e-1)* Projects set up under the Chief Minister Solar Agriculture Feeder Scheme in the Gram Panchayat limits, by the Maharashtra Power Generation Company and has been registered with Maharashtra Energy Development Authority shall be exempted from property taxation for 30 years from the date of completion of set up of the project subject to the certificate of the competent authority i.e. the Maharashtra Power Generation Company or the Maharashtra Energy Development Authority, regarding the project being under Chief Minister Solar Agricultural Feeder Scheme specifying the date of completion of set up of the project in the certificate.".

3. In rule 20 of the Maharashtra Village Panchayats Taxes and Fees Rules, 1960 (hereinafter *referred to as* "the principal Rules"), in sub-rule *(1)* the following proviso shall be added, namely :—

"Provided that, the property tax including sanitary tax and lightning tax on the lands, buildings and property in the revenue area of the Panchayat which falls under the limits of the Maharashtra Industrial Development Corporation (hereinafter mentioned as "the said Corporation"), shall be recovered by the said Corporation, on behalf of the Panchayat and retain the 50 per cent. amount with itself and use that amount for administrative expenses incurred for collection of taxes and provide services mentioned at serial No. 29, 31(Part), 32, 39,40,41, 45, 50, 52 and 53 of the Village List enumerated in Schedule I under section 45 of the Maharashtra Village Panchayats Act and shall deposit 50 per cent. of the recovered amount to the Panchayat account. The said Corporation shall give a statement of taxes recovered by it in the every

Scanned by CamScanner

financial year, annually and the Panchayat may recover the taxes not recovered by the said Corporation, as per the sub-section *(7)* of section 129 of the said Act".

4. In Schedule A appended to PART II of the principal Rules, at serial no. 4, after explanation *(xi)* the following explanation shall be added, namely :—

"*(xii)* Solar power generation projects installed on land, shall be treated as only land or open plot and levied with minimum rate of tax on lands only. Other than Solar Panels, tax shall be levied as per the rules, on other construction or buildings having, for Solar power projects. For total solar power project, weightages of industrial and commercial usage shall not be applicable. Property tax shall not be levied on solar power generation plants installed on roof top of buildings. ".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VIJAY SHINDE,
Deputy Secretary to Government.

Scanned by CamScanner